## नि.दि.मु.क्र.०४/२०१४ मधील निशाणी क्र.१६८ वरील आदेश

## (CNRNo.MHSI090000042014)

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादींचा जबाब वाचला. उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०२. उभय पक्षांच्या कथनांच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केले असता, वादीच्या कथनांनुसार, प्रतिवादी क्र.०७ पंढरीनाथ गणपत कोयंडे हे दि.११/१०/२०२० रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तूतचा दावा वाटप व पृथ्थक कब्जाकरीता दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २२ च्या अनुषंगाने दाव्याचे कारण शिल्लक राहते. परीणामी, दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायसंगत वाटते. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**– आदेश –**

१. निशाणी क्र.१६८ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी खर्च म्हणुन रु.२००/-(रूपये दोनशे फक्त) प्रतिवादींना द्यावे.

३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2023.04.24 17:14:04 +1000

स्थळ : देवगड (एस.बी.वाळके)

दिनांक : २४/०४/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.